admn15-16


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

MCAER
कृषि परिषद

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद
२००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
वेबसाईट : www.mcaer.org

दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्रः मकृप/शिक्षण-१/२३१५/२५६२ दिनांक ८ सप्टेंबर,२०१५

## परिपत्रक

विषयः- राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या शासकीय / अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयातील रिक्त जागा (विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटा वगळता) भरण्याबाबत.

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामधील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने दि.२८/८/२०१५ पर्यंत राबविण्यात आली. यानंतर रिक्त असलेल्या जागा तसेच विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्याने झालेल्या रिक्त जागा भरण्याबाबत विद्यार्थी व महाविद्यालयांकडून या कार्यालयाकडे निवेदने प्राप्त झाली होती.

गुणवत्ता यादीतील प्रवेशोच्छुक उमेदवारांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून आणि महाविद्यालयातील रिक्त जागा विचारात घेता, सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात चारही कृषी विद्यापीठांमधील पदवी अभ्यासक्रमाच्या शासकीय / अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयातील रिक्त जागा (विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटा वगळता) भरण्यासाठी **दि. ११ ते १५ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर 'जागेवरील प्रवेश फेरी'** राबविण्यात येत आहे. यासंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती **सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये** देण्यात आली आहे.

ज्या कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावरील महाविद्यालयांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये नव्याने मान्यता दिलेली आहे किंवा ज्या महाविद्यालयांचा / वाढीव तुकडीचा चालू शैक्षणिक वर्षाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश नाही, अशा महाविद्यालयांनीसुध्दा सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करावी व प्रवेशाचा तपशील संबंधित कृषी विद्यापीठ आणि कृषी परिषद यांना **दि. १५ सप्टेंबर,२०१५ हया अखेरच्या दिवशी ई-मेलद्वारे** सादर करावा.

O/I ARIS Cell.
Pl. upload on Univ. website.
ARIS
Important.
Mgmt pl
A.D. (Instrum)/ T.O
for n.a.
Dean (Agri.)

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने.**

स्वाक्षरीत/-
**संचालक (शिक्षण)**

प्रति,

१. मा. कुलगुरु / कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

२. मे. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व कृषी विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांना तसेच राज्यस्तरीय प्रवेश गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे तसेच प्रत्येक महाविद्यालयाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात **आणि तदनुसार संबंधित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार यांना ई-मेल / 'एसएमएस'द्वारे कळविण्यात यावे.**

३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४,वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स,जय गणेश व्हिजन,आकुर्डी,पुणे ४११०३५.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.

admn15-16

## परिशिष्ट

## दि. ११ ते १५ सप्टेंबर,२०१५ या कालावधीत राबवावयाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या जागेवर प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत राबविण्यात आलेल्या प्रवेश फेऱ्यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. ११ ते १५ सप्टेंबर,२०१५ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश फेरी (**Spot Admission Round**) राबविण्यात येईल.

अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्याकडून **www.mcaer.org** व **maha-agriadmission.in** या संकेतस्थळावर दि. ०९ सप्टेंबर,२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार या जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात दि. ११ ते १५ सप्टेंबर,२०१५ **या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० या कालावधीत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(२) संबंधित महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी स्वतः **सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून ती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.**

(३) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर 'जागेवर प्रवेश फेरीच्या' (Spot Admission Round) शेवटच्या दिवशी म्हणजेच **दि. १५ सप्टेंबर,२०१५ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेसोबतच्या **परिशिष्ट-'अे'** येथे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी घ्यावी.**

(४) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे ('केटीपीएल'-KTPL) यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे महाविद्यालयांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावरील महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'केटीपीएल' यांची असेल.

(५) दि. ११ ते १५ सप्टेंबर,२०१५ या कालावधीत दररोज सायंकाळी ४.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी.

(६) महाविद्यालयांनी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) व 'केटीपीएल' यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(७) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारास त्याच्या 'लॉग इन'मध्ये प्रशासकीय कारणास्तव 'केटीपीएल'ने तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' उपलब्ध करून द्यावे.

(८) जागेवरील प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (जागेवरील प्रवेश फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

-----------------------------